अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ६३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## ऑस्ट्रेलियाचा पराभव करत पाकिस्तानचा वर्ल्ड रेकॉर्ड मागे टाकला

**रायपूर :** ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात भारताने २० धावांनी विजय मिळवला. या विजयासह भारताने ५ सामन्यांच्या मालिकेत ३-१ अशी विजयी आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करत भारताने ९ बाद १७४ धावा केल्या होत्या. उत्तरादाखल ऑस्ट्रेलियाला १५४ धावा करता आल्या. दोन्ही संघातील पाचवी आणि अखेरची टी-२० मॅच ३ डिसेंबर रोजी बेंगळुरू येते होणार आहे. या विजयासह भारताने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधील एक मोठा विक्रम नावावर केला. आता भारत टी-२० क्रिकेटमधील सर्वाधिक सामने जिंकणारा संघ झाला आहे. भारताने पाकिस्तानच्या टी-२० मधील १३५ विजयांचा विक्रम मागे टाकला. ऑस्ट्रेलियावरील चौथ्या सामन्यातील विजय हा भारताचा आंतरराष्ट्रीय टी-२० मधील १३६वा विजय ठरला.




भारताने दिलेल्या १७५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने चांगली सुरूवात केली होती. ४० धावांवर त्यांनी पहिली विकेट गमावली. रवी बिश्नोईने जोश फिलिप माघारी पाठवले. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने नियमित अंतराने विकेट गमावल्या. कर्णधार मॅथ्यू वेडने सर्वाधिक नाबाद ३६ धावा केल्या. भारताकडून अक्षर पटेलने सर्वाधिक ३ विकेट घेतल्या. तर दीपक चहरने २, बिश्नोई आणि आवेश खान यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# ‘भावकी’त लढाई?

# अजितदादांची बारामतीवर ‘स्वारी’ खुद्द काकांनाच पडणार ‘भारी’

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

**कर्जत येथील अजितदादा पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंथन शिबिरामुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापत चालले आहे.अजितदादांनी आपले काका शरद पवार यांच्यावर तुफान फटकेबाजी केली. शुक्रवारी त्यांनी अनेक खुलासे केल्याने राष्ट्रवादी पक्षातील फूट उघडपणे समोर आली आहे. दरम्यान अजितदादांनी त्यांचा गटाचा उमेदवार देण्याची घोषणा केल्याने शरद पवार यांच्या गटात एकच खळबळ उडाली आहे. अजितदादांनी एक काळजी घेतली, ती म्हणजे उमेदवाराची घोषणा केली नाही.त्यामुळे लॉटरी कुणाला लागणार? पत्नीला की मुलाला याविषयी राज्यात उत्सुकता निर्माण झाली आहे.अजितदादांनी बारामती लोकसभा मतदार संघावर दावा घोषीत केल्याने लोकसभेत पवारविरुद्ध पवार असा भावकीतच सामना रंगण्याची शक्यता आहे.**

कर्जतमधील शिबिरात अजितदादा म्हणाले की, मार्चच्या पहिल्या आठवड्यात लोकसभेची आचारसंहिता लागण्याचा अंदाज आहे. लोकसभेच्या निवडणुकीत एनडीएचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनाच आणण्यासाठी आपल्याला प्रयत्न करायचा आहे. महाराष्ट्रातून ४८ खासदार निवडून आणायचे आहेत. बारामती, शिरूर, सातारा, रायगड या जागा आपण निवडणार आहोत. पण त्याबरोबर ठाकरे गटाकडे ज्या जागा आहेत, त्यातल्याही काही जागा आपण लढवण्याचा प्रयत्न करणार आहोत. जागावाटपावर प्राथमिक चर्चा झाली आहे. पाच राज्यांच्या निवडणुकांनंतर यावर सविस्तर चर्चा करण्याचे आपले ठरले आहे. इतर जागांसंदर्भात आपण शिंदे, फडणवीसांशी चर्चा करून लवकरच निर्णय जाहीर करू अशी भूमिका त्यांनी जाहीर केली. तेव्हा पवार घराण्याचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या बारामतीत शरद पवार गटाकडून सुळेंना उमेदवारी दिल्यास आणि अजित पवार यांनी त्यांच्याच कुटुंबातील उमेदवार दिल्यास आगामी लोकसभेत पवारविरुद्ध पवार असा सामना रंगण्याची चिन्ह आहेत. बारामतीप्रमाणेच सातारा हा देखील राष्ट्रवादीचा बालेकिल्ला राहिलाय. पण आता पक्षात फूट पडल्यानंतर खासदार श्रीनावस पाटील यांच्याविरुद्ध अजित पवार गटाकडून नितीन लक्ष्मण पाटील यांना उमेदवारी देऊ शकतात. नियतीनं पाटील हे माजी खासदार पाटील यांचे चिरंजिव आहेत.



**सुनेत्रा पवार की, पार्थ ? :** आज अजित पवार यांनी उमेदवार देणार असल्याची घोषणा केली. परंतू बारामती लोकसभा अजित पवार त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना की, मुलगा पार्थ पवार यांना उमेदवारी देतात हे पहावे लागणार आहे. कुटुंबातीलच व्यक्ती विरोधात लढत असेल तर शरद पवार कोणता निर्णय घेतात हे पहावे लागणार आहे.

**आता गप्प बसणार नाही :** शरद पवार यांचे राईटहॅन्ड असणारे आ.जितेंद्र आव्हाड यांनी मुंबईच्या पत्रकार परिषदेत अजितदादांना सडेतोड उत्तर दिले आहे.तुम्ही पवार नसता तर बारामतीतून निवडून आला असता का? आम्ही आतापर्यंत बोलत नव्हतो, पण आता तुम्ही थेट शरद पवारांवर बोलत असाल तर आम्हीही काही गप्प बसणार नाही, आता जशास तसे उत्तर मिळतील असा इशारा आव्हाड यांनी अजित पवार गटाला दिला. मागील पाच वर्ष शरद पवारांचे डोके कुणी खाल्ले, चला बीजेपीत, चला बीजेपीत. तुम्हीच म्हणत होता ना असा थेट हल्ला आव्हाडांनी अजित पवारांवर केला.

### बारामतीतून सुळे खासदार

बारामती लोकसभा मतदार संघ हा पवार कुटुंबीयांचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जातो. आधी शरद पवार आणि त्यानंतर २००९ पासून सुप्रिया सुळे याच मतदार संघातून खासदार म्हणून संसदेत गेल्या आहेत. त्यांनी पहिला लोकसभा २००९ मध्ये, दुसरी २०१४ त्यानंतर २०१९ मध्येही त्या बारामतीतूनच उभ्या राहल्या आणि निवडून आल्या. मात्र, आता राष्ट्रवादीत दोन गट पडल्याने या लोकसभा मतदार संघावर अजित पवार यांनी उमेदवार देण्याची घोषणा केल्याने आगामी निवडणुकीत कसा सामना रंगतो हे पहावे लागणार आहे.

## गुजरात, टेरा इन्फोटेक यांना सेतूचा मक्ता

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर जिल्ह्यातील बारा सेतू सुविधा केंद्रासाठी दोन ठेकेदारांची निवड केली आहे. यासाठी गुजरात इन्फोटेक व टेरा इन्फोटेक, हैदराबाद या दोन्ही संस्थांचा समावेश आहे. प्रत्येक कंपनीला सहा या प्रमाणे १२ सेतू केंद्र चालवण्यास देण्याचा आदेश निवासी उपिजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांनी काढले आहेत.

अक्कलकोट, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, मंद्रुप, माढा, बार्शी या सहा ठिकाणच्या सेतू सुविधा केंद्राचा ठेका हैदराबादच्या टेरा इन्फोटेक संस्थेला देण्यात आला आहे. यात सोलापूर शहरातील सेतू सुविधा केंद्राचा समावेश आहे. पंढरपूर, मोहोळ, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा, करमाळा या सहा तालुक्यातील सेतू सुविधा केंद्राचा ठेका गुजरात इन्फोटेक या संस्थेकडे देण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिलेल्या आदेशानुसार निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांनी शुक्रवारी दोन्ही ठेकेदारांच्या निवडीचे आदेश काढले. ठेकेदारांना अनामत रक्कम व सुविधा केंद्रात आवश्यक यंत्रणा निर्माण करण्यासाठी एक महिन्याची वेळ देण्यात आली आहे. त्यामुळे जानेवारी महिन्यातच सेतू सुविधा केंद्र सुरु होणार आहे.




**ज्या ठेकेदाराचे काम असमाधानकारक असेल त्या ठेकेदाराच्या कामाचे स्थळ बदल करण्याचाही निर्णय ही जिल्हाधिकारी यांनी घेतला आहे. यामुळे सेतू ठेकेदारांकडून पारदर्शक व गतीमान कामकाज निर्माण होण्यास मदत होणार आहे.**




**पंढरपूरः श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने प्रक्षाळपुजेनिमित्त गाभारा, संत नामदेव पायरी, विठ्ठल सभामंडप, रुक्मिणी माता सभामंडपासह संपूर्ण मंदिरात आकर्षक अशी फुलाची सजावट केली होती.**

## लग्नात मानपान केला नाही म्हणून विवाहीतेचा छळ

**सुराज्य/सोलापूर**

सासरकडच्या मंडळींनी संगनमत करून घरातील किरकोळ कारणावरून भांडण करत लग्नात मानपान केला नाही. हुंडा सोने दिले नाही असे बोलून विवाहितेला माहेरून १० लाख रुपये घेऊन ये नाहीतर आमच्या मुलाचे दुसरे लग्न करू अशी दमदाटी मारहाण केली.

याप्रकरणी श्वेता तुषार कामूर्ती (वय-२१, रा.दत्त नगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून पती तुषार मुकुंद कामुर्ती, सासू मिनाक्षी मुकुंद कामुर्ती, सासरे मुकुंद निलकंठ कामुर्ती यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास मपोसई तळे या करित आहे.

## एक लाख लाचेची मागणी करणारा फौजदार ॲन्टी करप्शनच्या जाळ्यात

### पोलीस उपनिरीक्षक विक्रम रजपूत यांच्यावर कारवाई

**सुराज्य/सोलापूर**

गुन्ह्याच्या तपासातील आरोपीवर प्रतिबंधक कारवाई न करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाने एक लाख रूपयांची लाच स्विकारण्यास संमती दिल्याचे निष्पन्न झाल्याने सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पोलीस उपनिरीक्षक विक्रम रजपूत यांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु सुरू असल्याचे एसीबी कार्यालयाने एका प्रसिध्दी पत्रकान्वये सांगितले.

एमआयडीसी पोलीस ठाण्यात नेमणुकीस असलेले पोलीस उपनिरीक्षक विक्रम प्रतापसिंग रजपूत, तक्रारदारांचे मित्र यांच्यावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास यांच्याकडे सोपविण्यात आला होता. पीएसआय विक्रम रजपूत यांनी त्या गुन्ह्यामध्ये मदत करण्यासाठी, तक्रारदार यांच्या मित्रांवर यापूर्वीही ॲट्रोसिटी, इतर गुन्हे दाखल असून, त्यांच्यावर सीआरपीसी कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई न करण्यासाठी स्वता:साठी पोनि राजन माने यांच्या नावे दोन लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती एक लाख रुपये लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झाले.



प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या नेतृत्त्वाखालील पथकाने शुक्रवारी (दि.१ डिसेंबर) दुपारी पोलीस उपनिरीक्षक रजपूत यास ताब्यात घेतले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे-खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार, पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी, पोलीस अंमलदार, शिरीषकुमार सोनवणे, श्रीराम घुगे, अतुल घाडगे, पोना संतोष नरोटे, स्वामीराव जाधव, गजानन किणगी, श्याम सुरवसे ( ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर) यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पुन्हा कधीच जाणार नाही तिथे, गुदमरल मला !

कल्याण
580-33-139

मुंबई
180-97-188

### अवकाळीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना मिळणार लाभ

## जिरायतसाठी ८५००, बागायत १७ हजार; फळपिकांसाठी २२.५०० रुपये नुकसान भरपाई

**सुराज्य/सोलापूर**

जिल्ह्यात २६ ते २८ नोव्हेंबरला झालेल्या अवकाळी पावसाने तब्बल २९ हजार ७६८ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यात नुकसान झालेल्या जिरायत क्षेत्रावरील पिकांसाठी ८ हजार ५००, बागायती पिकांसाठी १७ हजार तर फळपिकांसाठी २२ हजार ५०० रुपये प्रती हेक्टर याप्रमाणे दोन हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी कांबळे यांनी दिली.

अवकाळी पावसाचा जिल्ह्यातील सुमारे ३७ हजार शेतकऱ्यांना फटका बसला असल्याचा प्राथमिक अहवाल कृषी खात्याकडून जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आला आहे.

**दोन हेक्टर क्षेत्राच्या मर्यादित अवकाळीग्रस्तांना मिळणार मदत**



पिकांच्या नुकसानीची पाहणी व पंचनामे युध्दपातळीवर सुरु असून येत्या पाच दिवसात याबाबत अंतिम अहवाल तयार होईल, असे सांगण्यात आले.

अवकाळी पावसाने दक्षिण सोलापूर तालुक्यातील पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. या तालुक्यातील २७ हजार ३६० शेतकऱ्यांचे तब्बल २१ हजार २४७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यात जिरायत क्षेत्राचे १५ हजार ४७३ हेक्टर, बागायत क्षेत्राचे ४ हजार ७३ तर फळपिकांचे १ हजार ७०० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील २ हजार ४८५ शेतकऱ्यांचे १ हजार ८९२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यात जिरायत १२, बागायत १ हजार ४२० व फळपिकांचे ४६० हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले. मंगळवेढा तालुक्यातील ६ हजार ५६६ शेतकऱ्यांचे ५ हजार ७५५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. यात जिरायत ४ हजार ४९५, बागायत ५८७ तर फळपिकांचे ६८१ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. अक्कलकोट तालुक्यातील ५१३ शेतकऱ्यांचे ३४% हेक्टर बागायत क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. मोहोळ तालुक्यातील २४० हेक्टर बागायत तर २४२ हेक्टर क्षेत्रावरील फळपिकांचे नुकसान झाले. सांगोला तालुक्यातील ४४ हेक्टर क्षेत्रावरील ७६ शेतकऱ्यांचे नुकसान झाले. यात ३ हेक्टर जिरायत तर ४१ हेक्टर फळपिकांचा समावेश आहे.

## आरक्षण घेतल्याशिवाय मागे हटणार नाही; जरांगेंचा इशारा

**जालना :** आम्ही ओबीसीतूनच आरक्षण घेणार, आम्ही दंड आणि मांड्या थोपटल्या आहेत, आता तुम्हाला सुट्टी नाही. आरक्षण दिले नाही तर गाठ मराठ्यांशी आहे, असा इशारा मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला. मनोज जरांगे पाटील यांची जालन्यात विराट सभा पार पडली. यावेळी त्यांनी सरकारला इशारा देण्यासोबतच छगन भुजबळांवरही जोरदार हल्लाबोल केला.



राज्य सरकारने कुणा एकट्याच्या दबावाखाली येऊन मराठ्यांशी दगाफकटा केला तर सुट्टी देणार नाही. ७० वर्षांपासून आमच्यावर अन्याय होतोय, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना २४ डिसेंबरपर्यंची वेळ आहे, २४ तारखेला सरसकट आरक्षण मिळाले नाही, तर गाठ मराठ्यांशी आहे, असा इशाराही जरांगे यांनी यावेळी सरकारला दिला. जरांगे पुढे म्हणतात, ओबीसी आरक्षणाचा फक्त एका जातीला फायदा झाला आहे. २००० ते २०१४ या काळात या व्यक्तींने ८० टक्के हिस्सा एकट्याने खाल्ला, इतर ३०० जातींना २० टक्के हिस्सा मिळाला. याला फक्त सभेला धनगर समाज लागतो. आम्ही त्यांना म्हटलं की, धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मुद्यावर भूमिका जाहीर करा, ते करत नाही.